क्रमांक व [illegible] / चांदूर बाज

# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती
दि.१७/०३/२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपी लोकसेवकाचे नाव, हुददा, व कार्यालयाचा पत्ता | श्री.नितीन कुमार दिनेशचंद्र उजवणे, वय ४० वर्ष, पद आगार व्यवस्थापक, एस.टी. डेपो चांदूर बाजार, जि. अमरावती, वर्ग–२. |
| ३ | अपराध घडला तारीख | दि.१७/०३/२०२० चे १५/३० वा. |
| ४ | लाच मागणी केलेली रक्कम | ५,०००/– रुपये |
| ५ | स्विकारली लाच रक्कम | तडजोडीअंती २०००/–रु. |
| ६ | घटनास्थळ | एस.टी. वर्कशॉप कार्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती. |

यातील तक्रारदार चांदूर बाजार आगार येथे चालक या पदावर कार्यरत असून तक्रारदार यांना डेपो मॅनेजर श्री.उजवणे यांनी कारणे दाखवा नोटीस देउन सहा महिने कायमस्वरुपी वेतनवाढ थांबवण्याची शिक्षा देउन तक्रारदार यांना सस्पेंड करण्याची धमकी दिली व त्यांना सस्पेंड न करण्यासाठी डेपो मॅनेजर यांनी यांनी तक्रारदार यांना ५,०००/–रू. लाचेची मागणी केल्याबाबत लेखी तक्रार दि.०४/०३/२०२० रोजी प्राप्त झाली.

लेखी प्राप्त तक्रारीवरुन शासकीय पंचांसमक्ष आज दि.१७/०३/२०२० रोजी पंचांसमक्ष पडताळणी केली असता तक्रारदाराने लेखी तक्रारीमध्ये नमुद केल्याप्रमाणे तक्रारदार यांना सस्पेंड न करण्यासाठी तडजोडीअंती २,०००/–रू. लाचेची मागणी करून श्री.उजवणे डेपो मॅनेजर यांनी लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याने तात्काळ सापळा कार्यवाहीचे नियोजन करुन सापळा कार्यवाही केली असता आलोसे यांनी त्यांचे कार्यालय एस.टी. वर्कशॉप येथे तक्रारदार यांना बोलावून पंचांसमक्ष २०००/–रुपये लाच स्विकारल्याने आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.श्रीकांत धिवरे, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, अपर पोलीस अधीक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे व पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक संतोष शेगांवकर, पो.हवा.श्रीकृष्ण तालन, ना.पो.कॉ.प्रमोद धानोरकर व चालक अकबर हुसेन यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क्र. – ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर – १०६४.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

(संतोष शेगांवकर)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

Scanned by CamScanner